**अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उणे (-)**
**रकमेच्या देयकांची प्राधिकारपत्रे काढणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
**शासन परिपत्रक क्रमांक : अविप्र - १०.०८/प्र.क्र. १४/अर्थसंकल्प -४,**
**दिनांक : २८ नोव्हेंबर, २००८.**

**संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक अविप्र -१०.०८/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प -४, दि. ३ मे, २००८ व शासनाचे समक्रमांकित दिनांक ९ जून, २००८ चे पत्र.**

## परिपत्रक

सन २००८-२००९ करिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकारी स्तरावर उणे (-) देयक प्राधिकारपत्र काढण्याची सुविधा देण्यात आलेली असून सदर सुविधा अद्यापही कार्यान्वित आहे. सदर सुविधा अर्थसंकल्प वितरण प्रणाली २००८-२००९ मध्ये नवीन सुधारणा प्रस्तावित असल्याने व त्या विकसित होण्यास काही कालावधी लागणार असल्याने देण्यात आल्या होत्या.

२. आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर २००८-०९ वर अखर्चित रक्कम पुढे ओढणे (Carry Forward), कॅश फ्लो बदलणे (Change Cashflow), विभागस्तरावर पुनर्विनियोजन (Re-appropriation) अशा आवश्यक सुविधा देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे नविन सुधारीत देयक प्राधिकारपत्र मोड्युल (Bill Entry Module) कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सरसकट उणे (-) प्राधिकारपत्र काढण्याची दिलेली सुविधा बंद करुन ती फक्त खालील बाबींसाठी लागू करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, नियम क्र. १५३ (१०) अन्वये नमूद केलेल्या बाबी उदा. वेतन, गुप्त सेवांवरील खर्च, नैसर्गिक आपत्ती इ.

२. सन २००८-२००९ मध्ये नव्याने उघडण्यात आलेली व पुरेसे अनुदान मंजूर नसलेली ०३ - अतिकालिक भत्ता, ०६-विज पाणी दूरध्वनी देयक, १० - कंत्राटी सेवा याकरिताचे प्रदान, ३५ - सहाय्यक अनुदाने (वेतन) ही तपशिलवार शिर्षे.

३. ०४ -निवृत्तीवेतनवरील खर्च.

४. जिल्हा योजनांवरील खर्च.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सु. प्र. कानडे)**
**सहसचिव, वित्त विभाग.**